# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC/ADM/NOTIFICATION/ 22 /2022 DATE :- 24 /03/2022

## ''वाहतूक नियंत्रण अधिसुचना''

कल्याण–डोंबिवली महानगरपालिका व उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या सोयी सुविधांसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे वतीने बारवी गुरूत्व पाणी पुरवठा योजना १७७२ मिलीलिटर व्यासाची गुरूत्व वाहिनी १ व २ तसेच १८०० मिमी. व्यासाचा कल्याण फिडर वाहिनीचा बदललेला भाग मजबुतीकरण करणे, एनकेसिंग करणे आणि जलवाहिनीचा बदललेला भाग टाकण्यात येणार असून सदर ठिकाणी ३५ मिटर परिसरात ४ फुट खोल खणून १८०० मिमी. व्यासाची जलवाहिनी टाकून त्यावर सिमेंट कॉक्रिटीकरण करण्यात येणार आहे. सदरचे काम २ टप्प्यात होणार असून त्याकरीता सुमारे १ महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्या संदर्भात नेवाळी नाका या ठिकाणी जलवाहिनीचे काम करावयाचे आहे. विठ्ठलवाडी वाहतूक उपविभागातील नेवाळी नाका येथून कल्याण कडे जाणाऱ्या मार्गावर वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद –** १) तळोजा नवी मुंबई कडून नेवाळी नाका मार्गे कल्याण शहराकडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना नेवाळी नाका येथे ''**प्रवेश बंद**'' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड–अवजड ही वाहने खोणी फाटा येथून डावीकडे वळण घेवून काटई नाका मार्गे कल्याण भिवंडी शहराकडे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कल्याण कडून नेवाळी नाका मार्गे बदलापूर व नवी मुंबई शहराकडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना चक्की नाका येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने ही टाटा नाका, मानपाडा पोलीस ठाणे, काटई नाका येथून तळोजा, नवी मुंबई मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) बदलापूर व अंबरनाथ कडून नेवाळी नाका मार्गे कल्याण/भिवंडी कडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना नेवाळी नाका येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने ही साईबाबा मंदिर, फॉरवर्ड लाईन, नेहरू चौक, वालधुनी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना दि. २८/०३/२०२२ ते काम पूर्ण होईपर्यंत लागू करण्यात येत आहे. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.

जिल्हाधिकारी, ठाणे

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद.

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.